टाटा ट्रस्ट व BPCL यांच्या सहाय्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पोषणतत्व गुणसंवर्धीत तांदूळ (Fortified Rice) वितरित करण्याचा प्रकल्प संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२६१८/१४९-५२/प्र.क्र.२६/नापु-२९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १४ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :

१) **शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२६१८/१४९-५२/प्र.क्र.२६/नापु २९, दिनांक ०१ जून, २०१८**
२) **केंद्र शासनाच्या अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे क्रमांकः १५-१/२०१७-BP-II, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे पत्र.**
३) **केंद्र शासनाच्या अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे क्रमांकः १५-१/२०१७-BP-II, दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजीचे पत्र.**
४) **केंद्र शासनाच्या अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे क्रमांकः १५-१/२०१९-BP-II, दिनांक २५ जुलै, २०१९ रोजीचे पत्र.**

प्रस्तावना -

देशात आणि राज्यात ॲनिमियाचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहे. २०१५-१६ च्या चौथ्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार, महाराष्ट्रातील ५३.८% मुलांमध्ये (वय ६ महिने ते ५ वर्ष), १० ते १८ वर्ष वयाच्या मुलींमध्ये ३८% व गर्भधारक महिलांमध्ये ५६% इतक्या मोठ्या प्रमाणात ॲनिमिया आढळून आला आहे. ॲनिमिया प्रामुख्याने रोजच्या जेवणात Vit A, B९/फॉलेट व B१२ या पोषणद्रव्यांच्या कमतरतेमुळे दिसून येतो. संशोधनाने हे सिद्ध केले गेले आहे की, जर पुरेश्या प्रमाणात जेवणातून लोह व इतर पोषकद्रव्य दिल्यास ॲनिमिया मोठ्या प्रमाणात नियंत्रणात आणता येतो. सद्य:स्थितीमध्ये लोहयुक्त गोळ्या देणे इ. पर्यायाने सरकारमार्फत ॲनिमिया नियंत्रणाचा प्रयत्न होत आहे. परंतु त्याला वेगळ्या पुरवठा व्यवस्थेची आवश्यकता आहे.

राज्यात पणन हंगाम २०१८-१९ मध्ये Fortified Rice (पोषणतत्व गुणसंवर्धीत तांदूळ) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरणाचा प्रकल्प टाटा ट्रस्टच्या मदतीने गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा व भामरागड या दोन तालुक्यांमध्ये १ वर्षाकरिता प्रायोगिक तत्वावर राबविण्यास वरील संदर्भ क्र.१ येथे नमुद दि. ०१ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. आता सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत **"राईस फोर्टिफिकेशन"** हा प्रकल्प राज्यातील एका जिल्ह्यात राबविण्याबाबत केंद्र शासनाने वरील संदर्भ क्र.२ येथे नमुद दि.१४/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या सूचनांनुसार राज्यातील जिल्ह्यांपैकी गडचिरोली जिल्ह्याची निवड करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच सदर प्रकल्प राबविण्याबाबत टाटा ट्रस्ट आणि BPCL (भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड) यांनी स्वारस्य दाखविले आहे. त्यानुसार टाटा ट्रस्ट आणि BPCL यांच्या सहाय्याने केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.४ येथे नमुद पत्रान्वये प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार (Operational & Technical Guidelines) गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा व भामरागड या दोन तालुक्यात तसेच उर्वरित १० तालुक्यांसह संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत Fortified Rice (पोषणतत्व गुणसंवर्धीत तांदूळ) वितरित करण्याचा प्रकल्प राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

केंद्र शासनाकडून निवड करण्यात आलेल्या आकांक्षित जिल्ह्यांमध्ये (Aspirational Districts) गडचिरोली जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. तसेच यापूर्वीच गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा व भामरागड या दोन तालुक्यांमध्ये पोषणतत्व गुणसंवर्धीत तांदूळ (Fortified Rice- ज्यामध्ये जीवनसत्व B-१२, फॉलिक ॲसिड व लोह या सूक्ष्म पोषक तत्वांचा समावेश करण्यात येईल) वितरीत करण्याचा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. त्यामुळे आता केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्र.२ येथे नमूद पत्रान्वये प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने, तसेच संदर्भाधीन क्र.४ येथील पत्रान्वये प्राप्त मार्गदर्शक सूचनांच्या (Operational & Technical Guidelines) अनुषंगाने Rice fortification and its distribution under Public Distribution System या योजनेंतर्गत पोषणतत्व गुणसंवर्धीत तांदूळ संपूर्ण जिल्ह्यात वितरीत करण्यासाठी गडचिरोली जिल्ह्याची या शासन निर्णयाद्वारे निवड करण्यात येत आहे.

२. संपूर्ण गडचिरोली जिल्हयात टाटा ट्रस्ट व BPCL च्या सहकार्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत Fortified Rice (पोषणतत्व गुणसंवर्धीत तांदूळ) वितरीत करण्याबाबतचा प्रकल्प सुरु झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर राबविण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर कालावधीच्या अखेर अंतिम मुल्यमापनाच्या आधारे (End line evaluation) या प्रकल्पाबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल

३. सदर प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्याकरिता टाटा ट्रस्ट व BPCL या कंपनीशी शासनाच्या वतीने करारनामा करण्यास जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्र.४ येथील मार्गदर्शक सूचनांनुसार Rice fortification and its distribution under Public Distribution System या योजनेची गडचिरोली जिल्ह्यात अंमलबजावणी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेमार्फत करण्यात येईल.

४. सदर प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीचे प्रमाण, केंद्र शासन ७५% व राज्य शासन २५% असे राहील. तथापि, गडचिरोली जिल्ह्यात सदर प्रकल्प राबविण्याकरिता BPCL ही कंपनी त्यांच्या कंपनी सामाजिक दायित्वांच्या माध्यमातून (CSR) पूर्णत: (१००%) आर्थिक सहकार्य करणार आहे.

५. या प्रकल्पाकरिता आवश्यक असणारे Fortified Rice Kernel (FRK) हे BPCL व टाटा ट्रस्ट यांच्या आर्थिक सहकार्याने खरेदी करण्यात येतील. या योजनेसाठी FRK Procurement/Rice Fortification यासाठी आवश्यक गुणवत्ता संवर्धन कार्यक्रम व प्रशिक्षण तसेच गुणवता नियंत्रण (Capacity building programme, Trainning & Quality control) याबाबत टाटा ट्रस्ट, तांत्रिक व आर्थिक सहाय्य तर BPCL पूर्णत: आर्थिक सहाय्य करेल. FRK च्या गुणवत्तेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार (Operational & Technical Guidelines) आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी टाटा ट्रस्ट व BPCL यांची राहील.

६. या प्रकल्पांतर्गत तयार होणारा फोर्टिफाईड राईस केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार विशिष्ट चिन्हांकित बारदानामध्ये जमा करावयाचा आहे. सदर बारदान्यावर त्या हंगामातील कलर कोडींगव्यतिरिक्त फोर्टिफिकेशनचे निर्धारीत चिन्ह (+ F Logo), तसेच प्रस्तुत मार्गदर्शक सूचनांनुसार इतर आवश्यक आरोग्य विषयक मजकूर, पोषणतत्वे मात्रा इत्यादी असणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या गिरणीधारकाकडे राईस फोर्टिफिकेशनचे काम देण्यात आलेले आहे, त्या गिरणीधारकांनी शासनाकडून प्राप्त बारदान्यावर सदर मार्गदर्शक सूचनांनुसार चिन्ह (+ F Logo) व इतर आवश्यक मजकूर छापून घ्यावा. त्यासाठी त्यांना कोणताही अधिकचा खर्च दिला जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत फोर्टिफाईड राईस व सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्य तांदळाच्या गोण्या वेगवेगळया राहतील याची दक्षता घेण्यात यावी.

७. राईस फोर्टिफीकेशनसाठी आवश्यक असणारे FRK संबंधित गिरण्यांच्या जवळील शासनाच्या बेस गोदामात साठविण्यात येतील व त्याचा पुरवठा गिरण्यांना करण्यात येईल. गिरण्यांची क्षमता व त्यानुसार त्यांना देण्यात आलेल्या धानाच्या प्रमाणात दरमहा आवश्यक तितका FRK उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि, उपलब्ध करुन देण्यात आलेला FRK व फोर्टिफिकेशनसाठी विहित निकषांनुसार वापरलेला FRK यामध्ये तफावत आढळून आल्यास, सदर तफावतीच्या प्रमाणात FRK च्या खरेदी किंमतीच्या दीड पट दराने संबंधित मिलरकडून वसुली करण्यात येईल. त्याचप्रमाणे दिलेल्या धानाच्या प्रमाणात तयार झालेला फोर्टिफाइड राईस व शासकीय गोदामात प्रत्यक्ष प्राप्त झालेला फोर्टिफाइड राईस यामध्ये तफावत आढळल्यास सदर तफावतीच्या प्रमाणात त्यावर्षीच्या तांदळाची (C.M.R) किंमत अधिक FRK ची किंमत अशा एकूण किंमतीच्या दिडपट दराने वसूली करण्यात येईल. सदर कार्यवाही खरेदी व आढावा समितीकडून करण्यात येइल.

८. या प्रकल्पासाठी आवश्यक असणारा धान त्याच जिल्ह्यातून उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि अपवादात्मक परिस्थितीत धान उपलब्ध न झाल्यास तो लगतच्या जिल्ह्यांमधूनही उपलब्ध करुन देण्याची तरतूद राहील.

९. या प्रकल्पाकरिता करण्यात येत असलेल्या MoU नुसार पुढील समिती गठीत करण्यात येत असून, त्याची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील :-

<u>खरेदी व आढावा समिती</u>

I) जिल्हाधिकारी, गडचिरोली :- **अध्यक्ष**

II) **टाटा ट्रस्ट** यांचे प्रतिनिधी :- **सदस्य**

III) BPCL (भारत पेट्रोलीयम कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) यांचे प्रतिनिधी :- **सदस्य**

IV) विभागीय मार्केटिंग अधिकारी (RMO), गडचिरोली (महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ):- **सदस्य**

V) जिल्हा मार्केटिंग अधिकारी(DMO), गडचिरोली (महाराष्ट्र स्टेट कॉ.ऑप.मार्के.फेड.लि.):- **सदस्य**

VI) जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली :- **सदस्य सचिव**

<u>उपरोक्त समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल :-</u>

I) ब्लेंडिंग मशीन पुरविणाऱ्या विक्रेत्यांच्या (Vendors) नियुक्तीबाबतची कार्यवाही करणे.

II) राईस मिलर्सची तांत्रिक तपासणी (Technical Analysis) करुन त्यांची प्रकल्पासाठी नियुक्ती करणे.

III) सदर प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणारा Fortified Rice गहाळ किंवा चोरी होण्याच्या प्रकरणी कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी उपरोक्त समितीची राहील.

IV) वेळोवेळी आढावा घेऊन प्रकल्पाचे संनियंत्रण करणे.

V) केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचनांच्या (Operational & Technical Guidelines) अनुषंगाने FRK साठवणूक, मानवी आरोग्यास आवश्यक असलेली स्वच्छता (Hygiene), गुणवत्ता इत्यादी बाबतीत आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे.

१०. या प्रकल्पांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार (Operational & Technical Guidelines) करण्यात येणारी गुणवत्ता तपासणी टाटा ट्रस्ट तसेच शासनाचे गुणवत्ता नियंत्रण अधिकारी यांनी स्वतंत्रपणे करुन, त्याबाबतचा अहवाल नियमितपणे जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली यांना सादर करणे बंधनकारक राहील. जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली यांनी दोन्ही यंत्रणांकडून प्राप्त अहवालांमध्ये तफावत आढळून आल्यास त्याबाबत तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

११. करारात नमूद केल्यानुसार कामाची व्याप्ती राहील, तसेच उपरोक्त प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी एकत्रितपणे BPCL, टाटा ट्रस्ट व शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची राहील.

१२. सदर प्रकल्पाबाबत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सुचना (Operational & Technical Guidelines) सुलभ संदर्भासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या www.mahafood.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१४१५०५२४२८०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Food and Civil Supply, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2019.08.14 15:10:30 +05'30'

(सतीश सुपे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री, पणन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन, मुंबई.
८. मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑ.मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई.
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक.
१९. सर्व विभागीय आयुक्त.
२०. नियंत्रक (शिधावाटप), व संचालक नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
२१. सर्व जिल्हाधिकारी.
२२. सर्व उप आयुक्त (पुरवठा)
२३. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
२४. निवडनस्ती (नापु-२९).